**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १८ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **लोकसभेत गदारोळात व्हीबी-जी रामजी अर्थात 'विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी अभियान' विधेयक आवाजी मतदानानं मंजूर.**
2. **क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा स्वीकारण्याची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुख्यमंत्र्यांना विनंती.**
3. **आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार राम सुतार यांचं निधन, सर्व स्तरातून शोक व्यक्त.**
4. **अल्पसंख्यांकांच्या हक्कांची प्रभावी अभिव्यक्ती होण्याच्या उद्देशानं आज 'अल्पसंख्याक हक्क दिनाचं सर्वत्र आयोजन.**

---------------------------------------------

जीरामजी विधेयक

लोकसभेने आज गदारोळात "विकसित भारत - रोजगार आणि उपजीविकेची हमी अभियान (ग्रामीण)" अर्थात व्ही बी-जी रामजी विधेयक, २०२५ आवाजी मतदानाने मंजूर केल. ग्रामीण भागात रोजगार आणि उत्पादन सुरक्षितता सुनिश्चित करणे हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे. ग्रामीण विकास हा सरकारच्या धोरणाचा गाभा आहे. आधीच्या यूपीए सरकारने केवळ २ लाख १३ हजार कोटी रुपयेखर्च केले होते. मात्र, रालोआ सरकारने आठ लाख ५३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च केल्याचं या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले.दरम्यान, चौहान यांच्या भाषणावेळी विरोधकांनी सरकारविरोधात घोषणाबाजी केली. विधेयक स्थायी समितीकडे पाठवावे, या मागणीसाठी विरोधी पक्षांनी सभागृहाच्या वेलमध्ये उतरून जोरदार आंदोलन केलं, तर काही खासदारांनी विधेयकाच्या प्रती फाडल्याने वातावरण तापलं. यूपीए सरकारच्या काळात २००६ पासून ते २०१४ पर्यंत १ हजार ६६० कोटी दिवसांची रोजगार निर्मिती झाली होती, तर एनडीए सरकारच्या काळात ३ हजार २१० कोटी दिवसांचा रोजगार निर्माण झाल्याची माहिती चौहान यांनी लोकसभेत दिली. विकसित भारताचे प्रावधान या विधेयकात असल्याचे ते म्हणाले -

***(होल्ड बाईट - शिवराज सिंग चौहान - २१ सेकंद)***

***सौ  दिन की गारंटी के बजाय, हम 125 दिन की गारंटी दे रहे हैं न केवल गरीब का कल्याण  गांव का  संपूर्ण  विकास जो  महात्मा गांधी कहते  थे  -एक संपूर्ण गांव  एक  स्वावलंबी गांव एक  विकसित गांव का निर्माण इसका प्रावधान इसमें किया गया है।***

विधेयक मंजूर झाल्यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केलं. उद्या हिवाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. दरम्यान विरोधकांचं लोकसभेतील वर्तन अशोभनीय असल्याची टीका मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी पत्रकार परिषदेत केली.

---

कोकाटे

नाशिकच्या जिल्हा आणि सत्र न्यायालयातर्फे जारी करण्यात आलेल्या निर्णयाचा सन्मान राखून आणि नैतिक जबाबदारी स्वीकारून मंत्री माणिकराव कोकाटे यांनी आपल्या पदाचा राजीनामा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सोपवला आहे.  उपमुख्यमंत्र्यांनी तो स्वीकृत करण्याची विंनती  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे. मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार योजनेच्या दहा टक्के राखीव कोट्यातून मिळवलेल्या चार सदनिकांच्या घोटाळ्याप्रकरणी माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी तक्रार दाखल केली होती. त्यानुसार कोकाटे, आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयानं  दोषी ठरवलं होतं.

---

प्रज्ञा सातव

दिवंगत कॉँग्रेस नेते राजीव सातव यांच्या पत्नी आमदार प्रज्ञा सातव यांनी आज भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा झाला. भाजपा प्रवेश करण्यापूर्वी प्रज्ञा सातव यांनी विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्याकडे सदस्यत्वाचा राजीनामा सुपूर्द केला. मराठवाड्यातल्या हिंगोली जिल्ह्यातल्या प्रज्ञा सातव २०२१ मधे पहिल्यांदा विधानपरिषदेवर निवडून गेल्या. सोलापूर जिल्ह्यातले विधानसभेचे माजी आमदार दिलीप माने यांनीही भाजपात प्रवेश केला आहे. दरम्यान, ५ वर्षे आमदारकी शिल्लक असताना प्रज्ञा सातव यांच्या भाजप प्रवेशावर कॉँग्रेस आमदार विजय वड्डेट्टीवार यांनी नाराजी व्यक्त केली-

***(होल्ड बाईट - वडेट्टीवार - २७ सेकंद)***

दरम्यान, सातव यांच्या राजीनाम्याची घटना दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी दिली आहे.

-------------------------------------------

एकनाथ शिंदे/ फडणवीस

अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. स्पृहा डकरे यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सभा घेतली. अंजनगाव सुर्जी इथं आयोजित रोड शो ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यापारी संकुल, भूमिगत गटार लाईन, पाणीपुरवठा आणि दर्जेदार शाळांसह विविध विकास प्रकल्प राबविण्याचं आश्वासन दिलं. वर्धा जिल्ह्यातील देवळी नगरपरिषदेसाठी या शनिवारी मतदान होत आहे. आज सायंकाळी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस नगराध्यक्ष पदासाठीच्या भाजप उमेदवार शोभा तडस यांच्या प्रचारार्थ देवळी इथं सभा घेणार आहेत.

-------------------------------------------

राम सुतार निधन /शोक

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार राम सुतार यांचं आज नोएडा इथं वृद्धापकाळाने निधन झालं, ते १०० वर्षांचे होते. गुजरातमधला स्टॅच्यू ऑफ युनिटी हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा भव्य पुतळा त्यांनी उभारला होता. सुतार यांनी २०० हून अधिक भव्य पुतळ्यांची उभारणी करुन भारताच्या शिल्पकलेला आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळवून दिली. राम सुतार यांनी आतापर्यंत संसद भवनाच्या आवारातील अनेक विभूतींच्या मूर्त्या घडवल्या. शिल्पकलेतील योगदानाबद्दल सुतार यांना १९९९ साली पद्मश्री आणि २०१६ साली पद्मभूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं. राम सुतार यांना नुकतंच महाराष्ट्र भूषण पुरस्कारानंही सन्मानित करण्यात आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुतार यांना श्रद्धांजली वाहिली आहे. एक उल्लेखनीय शिल्पकार, ज्यांच्या कौशल्यामुळे भारताला स्टॅच्यू ऑफ युनिटीसह अनेक प्रतिष्ठित स्मारकं मिळाली, त्यांच्या कलाकृती नेहमीच भारताच्या इतिहासाची, संस्कृतीची आणि सामूहिक भावनेची शक्तिशाली अभिव्यक्ती म्हणून प्रशंसित राहतील, असं समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

-------------------------------------------

नाना पटोले

केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात येणाऱ्या सर्व विमानांमध्ये मराठी भाषेत उद्घोषणा करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे.

---------------------------------------------

अल्पसंख्यांक दिन

आज 'अल्पसंख्याक हक्क दिवस' आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने १८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्वीकारला. या जाहीरनाम्यानुसार अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म आणि परंपरा जतन करण्याचा अधिकार असून, या हक्कांची प्रभावी अभिव्यक्ती व्हावी, या उद्देशाने राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या सूचनेनुसार दरवर्षी हा दिवस साजरा करण्यात येतो. महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाच्या वतीने अल्पसंख्यांक हक्क दिनाचं आयोजन नागपुरातील जिल्हा नियोजन भवन इथं करण्यात आलं. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान उपस्थित होते. या वेळी राष्ट्रसेवा आणि समाज कार्यात योगदान देणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अल्पसंख्यांक समुदायाला सोबत घेणं अत्यंत आवश्यक असल्याचं प्रतिपादन यावेळी प्यारे खान यांनी केलं-

***(होल्ड बाईट - खान- २० सेकंद)***

***जिस देश में अल्पसंख्यक अगर सुरक्षित नहीं हैं वो देश कभी भी तरक्की नहीं कर सकता। तो ये गवर्नमेंट ने जो नारा दिया सबका साथ सबका विकास, सबका विश्वास और सब का प्रयास वो इसीलिए दिया ह□ कि इस देश का अल्पसंख्यक जो ह□ वो भी बड़ा हैं फर्स्ट टाइम ऐसा हुआ कि पूरे महाराष्ट्र में अल्पसंख्यक दिन मनाया जा रहा ह□ और सब जगह हर जिले में आप देखेंगे तो सारे कलेक्टर को ऑर्डर्स दिए गए हैं।***

भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयात देखील आज अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा झाला. भाषीक किंवा धार्मिक अल्पसंख्यांक देखील या देशाचे नागरिक आहेत. अल्पसंख्यांक नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनाचे पुर्ण सहकार्य राहील,असं आश्वासन जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी यावेळी दिल. त्याचप्रमाणे वाशीम सह सर्व जिल्ह्यांत आज हा दिवस साजरा करण्यात आला.

---------------------------------------------

बॉम्ब अफवा

नागपूर जिल्हा आणि सत्र न्यायालयाच्या परिसरात बॉम्ब असल्याचा ईमेल आज सकाळी न्यायालयाच्या अधिकृत ईमेल आयडीवर आल्याची माहिती जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष रोशन बागडे यांनी दिली. बॉम्बशोधक आणि निकामी करणारं पथक न्यायालय परिसराची कसून झडती घेत असून अद्याप तरी काही संशयास्पद सापडलं नसल्याचं पोलिसांनी सांगितलं. आरडीएक्स असलेली दोन शक्तिशाली उपकरणं या परिसरात असल्याचं या मेलमधे म्हटलं होतं.

---------------------------------------------

अमरावती महानगरपालिका

निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, मुक्त, निष्पक्ष आणि  कायदेशीर पद्धतीने पार पाडण्यासाठी अमरावती महानगरपालिका प्रशासनाने तयारीला वेग दिला असून त्या अनुषंगाने निवडणूक अधिकाऱ्यांचं  सविस्तर प्रशिक्षण आज आयोजित करण्यात आलं. निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी १, २, ३ तसेच क्षेत्रीय अधिकारी यांचे निवडणुकीसंदर्भातील प्रशिक्षण आज विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात  आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलं.

---------------------------------------------

दिव्यांग युवती अबोली

नागपूरच्या धंतोली इथं दिव्यांग युवती अबोली विजय जरीत हिला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ‘राष्ट्रीय दिव्यांगजन सशक्तीकरण पुरस्कार-2025’ प्रदान करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील पहिली व्हीलचेअर मॉडेल असलेल्या अबोलीने मॉडेलिंग, गायन आणि मोटिवेशनल स्पीकिंगच्या माध्यमातून राष्ट्रीय आणि  आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण केली आहे.

***(होल्ड बाईट - २६ सेकंद)***

***(मला क्रोनिक किडनी डिसीज आहे आणि अपसेट युरिनरी ब्लडर ज्यात माझ्या दोन्ही किडनी डॅमेज आहेत आणि नॉर्मल साईझपेक्षा छोट्या आहे. मी  सगळंच काही करते मला कुकिंग करायला आवडते मला डाँसिन्ग करायला  आवडते ,मला ड्रॉईंग आवडते म्हणजे अशी कुठलीही गोष्ट नाही कि मी ते नाही करू शकत. आज माझ्या फॅमिलीचा सपोर्ट मला भरपूर मिळाला आहे.  या सगळया गोष्टीत मी जे काही करते त्यात मला ते सगळे सपोर्ट करतात.***

---------------------------------------------

हवामान

हवामान! विदर्भात आज गोंदिया इथं ८.४ अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. तर नागपुरात आज १० अंश सेल्सियस इतक किमान तापमान नोंदवलं गेलं.

---------------------------------------------